# छत्रपती शिवाजी महाराज पुरस्काराची लवकरच घोषणा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्यावतीने देण्यात येणाऱ्या पहिल्या 'छत्रपती शिवाजी महाराज पुरस्कार' विजेत्याचे नाव सोमवारी (दि. १६) निवड समितीच्या बैठकीत निश्चित करण्यात आले. 'नाबार्ड'चे माजी अध्यक्ष व समितीचे अध्यक्ष यशवंत थोरात अध्यक्षस्थानी होते. निवड समितीची आणखी एक बैठक घेऊन पुरस्कार विजेत्याची घोषणा करण्यात येणार आहे. जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यात हा सोहळा होण्याची शक्यता आहे. ५ लाख रुपये रोख, मानचिन्ह व स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरुप आहे.

बैठकीस ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर, ज्येष्ठ इतिहास संशोधक प्रा. डॉ. जयसिंगराव पवार, 'पुढारी'चे मुख्य संपादक प्रतापसिंह जाधव, माजी कुलगुरु डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, व्यवस्थापन परिषद सदस्य ॲड. धैर्यशील पाटील (सातारा), कुलपती नियुक्त सदस्य अमित कुलकर्णी, मानवशास्त्र विभागाच्या अधिष्ठाता डॉ. भारती पाटील उपस्थित होते. जी नावे पुरस्कारासाठी पुढे आली आहेत त्यातील शॉर्टलिस्ट केली असून संबंधित व्यक्तींची परवानगी घेतल्यानंतर समितीची अंतिम बैठक घेऊन पुरस्कार विजेत्याची घोषणा केली जाणार आहे.

अध्यक्ष थोरात म्हणाले,'समितीने निवडलेली नावे योग्य असून त्या-त्या क्षेत्रात नावलौकिक मिळविलेली आहेत. तरुणांसाठी आदर्श व्यक्तीची निवड योग्य ठरेल.' डॉ. काकोडकर म्हणाले, 'पुरस्कारासाठी समिती ठरवेल ते नाव सार्थ असणार आहे. ते राष्ट्रीय एकात्मता व नव्या पिढीसाठी आदर्श, प्रेरणादायी ठरणार आहे.

डॉ. कोत्तापल्ले म्हणाले, 'निवड समितीने पुरस्कारासाठी ठरविलेली नावे मोठी आहेत. या नावांबरोबरच एखाद्या सेवाभावी संस्थेचा पुरस्कारासाठी विचार व्हावा.

कुलगुरु शिंदे, प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांनीही सूचना केल्या.

# उत्तुंग व्यक्तिमत्त्वाची निवड करा

## ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर; छत्रपती शिवाजी महाराज पुरस्कार निवड समितीची बैठक

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

छत्रपती शिवाजी महाराज पुरस्कारासाठी निवड समितीने केलेले काम अभिनंदनीय आहे. या पुरस्कारासाठी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या उत्तुंग व्यक्तिमत्त्वाचे प्रतिबिंब असलेल्या व्यक्तीची निवड करावी, असे उद्‍गार ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर यांनी काढले.

ते शिवाजी विद्यापीठात झालेल्या छत्रपती शिवाजी महाराज पुरस्कार निवड समितीच्या बैठकीत बोलत होते. याप्रसंगी 'नाबार्ड'चे माजी अध्यक्ष डॉ. वाय. एस. पी. थोरात यांची प्रमुख उपस्थिती होती. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते.

डॉ. वाय. एस. पी. थोरात म्हणाले, पुरस्कारासाठी समिती ठरवेल ते नाव सार्थ असणार आहे. ते राष्ट्रीय एकात्मता व नव्या पिढीसाठी आदर्श, प्रेरणादायी ठरेल. समितीने निवडलेली नावे योग्य असून त्या-त्या क्षेत्रातील नावलौकिक मिळवलेली आहेत.

डॉ. प्रतापसिंह जाधव म्हणाले, शिवाजी विद्यापीठातर्फे देण्यात येणारा छत्रपती शिवाजी महाराज पुरस्कार मोठा आहे. निवड समितीचे काम चांगले सुरू असून पुरस्कारासाठी सुचवलेल्या नावांशी आपण सहमत आहोत. या पुरस्काराची उंची वाढावी यासाठी प्रयत्न व्हावेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. नागनाथ कोत्तापल्ले म्हणाले, निवड समितीने पुरस्कारासाठी ठरवलेली नावे मोठी आहेत. या नावांबरोबरच एखाद्या सेवाभावी संस्थेचा पुरस्कारासाठी विचार व्हावा.

प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, समितीने पुरस्कारासाठी ठरवलेल्या नावांबद्दल आदर आहे. विद्यापीठाचा सन्मान ठरेल आणि समाज व देशात चांगला संदेश जाईल, अशा व्यक्तीची निवड समितीने करावी.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावाने सुरू असलेल्या विद्यापीठात ९८.२ टक्के विद्यार्थी हे ग्रामीण भागातील आहेत. कष्ट, प्रामाणिकपणा व ध्येयाने पछाडलेले हे विद्यार्थी आहेत. त्यामुळे पुरस्कारासाठी निवडलेला व्यक्ती त्यांच्यासाठी आदर्शवत राहील असे नाव निश्चित केले जावे.

याप्रसंगी ज्येष्ठ इतिहास संशोधक प्रा. डॉ. जयसिंगराव पवार, शिवाजी विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य ॲड. धैर्यशील पाटील (सातारा), कुलपती नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य अमित कुलकर्णी, मानव्यशास्त्र विभागाच्या अधिष्ठाता डॉ. भारती पाटील आदी उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी उपस्थितांचे आभार मानले.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात झालेल्या छत्रपती शिवाजी महाराज पुरस्कार निवड समितीच्या बैठकीस उपस्थित मान्यवर.** (छाया : पांडुरंग पाटील)


# ‘तुघलक’मधून मानवी व्यवहारावर भाष्य

## विद्यापीठाच्या खुल्या रंगमंचावर सादरीकरण; विद्यार्थ्यांची लक्षणीय उपस्थिती

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

ऐतिहासिक आणि बहुचर्चित गिरीष कर्नाड निखित ‘तुघलक’ नाटकातून ऐतिहासिक याबरोबरच मानवी व्यवहार, धर्म, राजकारणावर भाष्य करीत वास्तववादाचा धांडोळा घेण्यात आला.

शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र विभागातर्फे ‘तुघलक’ नाटकाचा प्रयोग मंगळवारी सायंकाळी सहा वाजता विद्यापीठाच्या विद्यार्थी वसतिगृहाशेजारील खुल्या रंगमंचावर सादर करण्यात आला. हा दोन अंकी नाट्यप्रयोग विद्यार्थी विकास विभाग व मराठी, इंग्रजी आणि विदेशी भाषा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, ज्येष्ठ नाट्य समीक्षक प्रा. अविनाश सप्रे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित गिरीष कर्नाड लिखित ‘तुघलक’ नाटकातील एक प्रसंग. (छाया : नाज ट्रेनर)**

‘तुघलक’ हे गिरीष कर्नाड यांचे बहुचर्चित व उत्तम साहित्यिक दर्जा असलेले नाटक आहे. विजय तेंडुलकर यांनी याचा मराठी अनुवाद केला आहे. नाटकात तुघलक यांच्या आयुष्यातील महत्त्वाच्या गोष्टी, त्यांनी घेतलेले निर्णय, राजधानी बदलण्याचा निर्णय, हिंदू-मुस्लिम सलोख्यासाठी केलेले प्रयत्न यांचे वास्तवदर्शी चित्रण मांडण्यात आले.

नाट्यप्रयोगात संगीत व नाट्यशास्त्र विभागाचे २५ विद्यार्थी कलाकार व तंत्रज्ञ सहभागी झाले होते. दिग्दर्शन ज्ञानेश मुळे यांनी केले. प्रकाश योजना डॉ. संजय तोडकर यांनी केली. नेपथ्य विनायक सुतार, पार्श्वसंगीत रोहित जोशी, रंगभूषा सदा सूर्यवंशी, वेशभूषा ओंकार पाटील यांनी केली. यावेळी विभागप्रमुख डॉ. अंजली निगवेकर, ज्येष्ठ नाट्य समीक्षक प्रा. अविनाश सप्रे, डॉ. रणधीर शिंदे, प्रा. डॉ. अक्षय सरवदे, डॉ. मेघा पानसरे, डॉ. नंदकुमार मोरे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 DEC 2019
तरुण भारत

# 'तुघलक' मधून राजकारणातील वास्तवावर भाष्य

प्रतिनिधी
कोल्हापूर

विजय तेंडुलकर यांनी मराठी अनुवाद केलेल्या 'तुघलक' या गिरीष कर्नाड यांच्या बहुचर्चित नाटकाचा नाट्यप्रयोग शिवाजी विद्यापीठात करण्यात आला. या नाटकातून आयुष्यातील महत्वाच्या गोष्टी, त्यांनी घेतलेले निर्णय, राजधानी बदलण्याचा निर्णय, हिंदू-मुस्लिम सलोख्यासाठी केलेले प्रयत्न यांचे वास्तवदर्शी चित्रण मांडण्यात आले. रसिकांनी टाळ्यांच्या गजरात दाद देत कलाकारांना प्रोत्साहन दिले.

शिवाजी विद्यापीठातील संगीत व नाट्यशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी 'तुघलक' नाटकाचा प्रयोग मंगळवारी विद्यापीठातील विद्यार्थी वसतिगृहाशेजारील खुल्या रंगमंचावर केला. हा दोन अंकी




कोल्हापूर : गिरीष कर्नाड लिखीत 'तुघलक' नाटकातील राजदरबारातील एक प्रसंग. (छाया. रियाज ट्रेनर)

नाट्यप्रयोग विद्यार्थी विकास विभाग व मराठी, इंग्रजी आणि विदेशी भाषा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता. नाट्यप्रयोगात संगीत व नाट्यशास्त्र विभागाचे २५ विद्यार्थी कलाकार व तंत्रज्ञ सहभागी झाले होते. दिग्दर्शन ज्ञानेश मुळे यांनी केले. प्रकाशयोजना डॉ. संजय तोडकर यांनी केली. नेपथ्य विनायक सुतार, पार्श्वसंगीत रोहित जोशी, रंगभूषा सदा सूर्यवंशी, वेशभूषा ओंकार पाटील यांनी केली.

# खुल्या रंगमंचावर रंगला 'तुघलक'चा प्रयोग

## कुलगुरूंकडून कौतुक; शिवाजी विद्यापीठातील प्रयोगाला प्रतिसाद

**कोल्हापूर, ता. १७ :** प्रसिद्ध साहित्यिक गिरीश कर्नाड लिखित 'तुघलक' या नाटकाचा प्रयोग शिवाजी विद्यापीठातील खुल्या रंगमंचावर आज सायंकाळी रंगला. शिवाजी विद्यापीठ संगीत व नाट्यशास्त्र विभाग; विद्यार्थी विकास विभाग; मराठी, इंग्रजी आणि विदेशी भाषा विभागांच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या या प्रयोगाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी कौतुक केले. दरम्यान, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात मंगळवारी सादर झालेल्या 'तुघलक' नाटकातील एक प्रसंग.** (मोहन मेस्त्री : सकाळ छायाचित्रसेवा)

'तुघलक' या नाटकाचा विजय तेंडुलकर यांनी मराठी अनुवाद केला आहे. ऐतिहासिक आणि बहुचर्चित अशा या अजरामर नाटकाचा प्रयोग नुकताच राज्य नाट्य स्पर्धेत सादर झाला होता. दिग्दर्शक ज्ञानेश मुळे यांनी या नाटकाचे अधिकाधिक प्रयोग करण्याचे प्रयत्न नक्कीच केले जातील, असे सांगितले.

डॉ. संजय तोडकर (प्रकाशयोजना), विनायक सुतार (नेपथ्य), रोहित जोशी (पार्श्वसंगीत), सदा सूर्यवंशी (रंगभूषा), ओंकार पाटील (वेशभूषा) यांचे तांत्रिक सहाय्य होते. यावेळी विभागप्रमुख डॉ. अंजली निगवेकर, ज्येष्ठ नाट्य समीक्षक प्रा. अविनाश सप्रे, डॉ. रणधीर शिंदे, प्रा. डॉ. अक्षय सरवदे, डॉ. मेघा पानसरे, डॉ. नंदकुमार मोरे आदी उपस्थित होते.

**शिवाजी विद्यापीठ : संगीत, नाट्यशास्त्र विभागामुळे १० वर्षांनंतर खुल्या रंगमंचावर प्रयोग**

# विद्यार्थ्यांच्या प्रतिसादात रंगला 'तुघलक'


लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** चतुरस्र अभिनेते गिरीश कर्नाड यांच्या लेखणीतून उतरलेल्या आणि विजय तेंडुलकर यांनी नाट्यरूपांतरित केलेल्या 'तुघलक' या ऐतिहासिक कलाकृतीचे आव्हान लीलया पेलत शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी हे नाटक मंगळवारी सादर केले. या निमित्ताने विद्यापीठाच्या खुल्या रंगमंचावर बऱ्याच वर्षांनी पुन्हा नाटकाची तिसरी घंटा वाजली.

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते नाटकाचे उद्घाटन झाले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, विभागप्रमुख डॉ. अंजली निगवेकर, मेघा पानसरे, डॉ. रणधीर शिंदे, नंदकुमार मोरे उपस्थित होते. यावेळी कुलगुरू म्हणाले, विद्यापीठातील नाट्यशास्त्र विभागाकडून नाटक बसविले जाते आणि सक्षमपणे सादर होते, ही बाब अभिमानास्पद आहे. अशा नावीन्यपूर्ण प्रयोगांना आणि विद्यार्थ्यांना शिक्षणासोबतच त्यांच्या क्षेत्रातील कलागुणांना वाव देण्याचा प्रयत्न विद्यापीठाकडून केला जाईल.

दिग्दर्शक ज्ञानेश मुळे म्हणाले, मोहम्मद बिन तुघलक या सुलतानाच्या विक्षिप्त गोष्टींवर हे नाटक बेतले आहे. नाट्यक्षेत्रातील दिग्गज कलावंतांनी निर्माण केलेल्या या ऐतिहासिक नाटकाचे सादरीकरण करणे, हेच मोठे आव्हान होते. मात्र विभागातील नव्या पिढीतील विद्यार्थ्यांनी नाटक समजून घेऊन आपल्या भूमिका वठविल्या. नाट्यसमीक्षक अविनाश सप्रे यांनी 'तुघलक'चा काळ, त्यांनी घेतलेले निर्णय, परिणाम याची माहिती दिली.

या नाटकाच्या माध्यमातून विद्यापीठातील संगीत व नाट्यशास्त्र विभागाने राज्य नाट्य स्पर्धेत पाऊल ठेवले. शिवाजी विद्यापीठाच्या प्लेन बिल्डिंगशेजारील खुल्या रंगमंचावर हे नाटक सादर झाले. तब्बल १० वर्षांनी हा रंगमंच कलाकारांचे आवाज, नाटकाची घंटा, नेपथ्य, स्पॉटलाईटने सजला. यावेळी विद्यार्थ्यांसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**शिवाजी विद्यापीठातील खुल्या रंगमंचावर मंगळवारी संगीत व नाट्यशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी 'तुघलक' नाटक सादर केले.**



'सिर्गेइ इसेनिन पुरस्कार - २०१९' हा आंतरराष्ट्रीय पुरस्कार डॉ. मेघा पानसरे यांना देण्यात आला. याप्रसंगी के. श्रीकुमार, टॉम जोस फ्योदर राझोव्स्की, रतीश नायर, तत्याना पिरोवा आदी.

# डॉ. मेघा पानसरे यांना आंतरराष्ट्रीय पुरस्कार

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभागप्रमुख व रशियन भाषेच्या सहायक प्राध्यापक डॉ. मेघा पानसरे यांना तिरुवनंतपुरम रशियन सांस्कृतिक केंद्र, व शासकीय इसेनिन म्युझियम, मॉस्को या संस्थांच्या वतीने 'सिर्गेइ इसेनिन पुरस्कार - २०१९' हा आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आला. तिरुवनंतपुरम येथे रशियन दुतावासातर्फे आयोजित 'रशियन भाषा व साहित्य महोत्सवा'त डॉ. पानसरे यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. रशियन भाषा व साहित्य लोकप्रिय करण्यात त्यांनी केलेल्या योगदानाबद्दल रशियन कवी सिर्गेइ इसेनिन यांची अर्ध-मूर्ती, प्रमाणपत्र व पदक या स्वरुपात हा सन्मान झाला. डॉ. मेघा पानसरे यांचे रशिया व रशियन संस्कृतीसंबंधी लेखन, साहित्यिक भाषांतर, रशियन साहित्यिक भाषांतर या विषयावर आंतरराष्ट्रीय स्तरावर संशोधन रशियन भाषा व साहित्य अध्यापन या कार्याची दखल घेऊन त्यांची निवड करण्यात आली.

डॉ. पानसरे म्हणाल्या, 'हा पुरस्कार म्हणजे ३० वर्षांच्या या क्षेत्रातील कामाचा सन्मान आहे.' याप्रसंगी तिरुवनंतपुरमचे महापौर के. श्रीकुमार, तसेच केरळचे मुख्य सचिव टॉम जोस 'रुसोत्रुद्नीचेस्त्वो' या संस्थेचे भारतातील मुख्य प्रतिनिधी फ्योदर राझोव्स्की रशियाचे मानद राजदूत रतीश नायर, रशियन दुतावासाच्या सांस्कृतिक विभागाच्या प्रमुख तत्याना पिरोवा आदी उपस्थित होते.



तिरुवनंतपुरम : डॉ. मेघा पानसरे यांना 'सिर्गेई इसेनिन' पुरस्काराने सन्मानित करताना पी. रामकृष्णन, तिरुवनंतपुरमचे महापौर के. श्रीकुमार, केरळचे मुख्य सचिव टॉम जोस, फ्योदर राझोव्स्की, रतीश नायर आदी.

# 'सिर्गेई इसेनिन' पुरस्काराने डॉ. मेघा पानसरे सन्मानित

**तिरुवनंतपुरम :**

शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभागप्रमुख व रशियन भाषेच्या सहायक प्राध्यापक डॉ. मेघा पानसरे यांना रशियन सांस्कृतिक केंद्र, तिरुवनंतपुरम व शासकीय इसेनिन म्युझियम, मॉस्को यांच्या वतीने 'सिर्गेई इसेनिन २०१९' हा आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आला.

तिरुवनंतपुरम येथे रशियन दूतावासातर्फे आयोजित 'रशियन भाषा व साहित्य महोत्सवा'त डॉ. पानसरे यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. रशियन भाषा व साहित्य लोकप्रिय करण्यात त्यांनी केलेल्या योगदानाबद्दल भव्य कार्यक्रमात महान रशियन कवी सिर्गेई इसेनिन यांची अर्धमूर्ती, प्रमाणपत्र व पदक या स्वरूपात हा सन्मान झाला.

याप्रसंगी तिरुवनंतपुरमचे महापौर के. श्रीकुमार, तसेच केरळचे मुख्य सचिव टॉम जोस यांची भाषणे झाली. रशियाचे मानद राजदूत व रशियन संस्कृती केंद्र, तिरुवनंतपुरमचे संचालक रतीश नायर यांनी उपस्थितांचे स्वागत व प्रास्ताविक केले. याप्रसंगी रशियन दूतावासाच्या सांस्कृतिक विभागाच्या प्रमुख तत्याना पिरोवा, मल्याळी भाषेतील लेखक, अभिनेते, गायक, रंगकर्मी, ज्येष्ठ पत्रकार, उच्च प्रशासकीय अधिकारी अशा सर्व स्तरांतील लोक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विद्यापीठात आज क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड व्याख्यानमाला

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठ इतिहास विभागाच्या वतीने बुधवार (दि. १८) रोजी सकाळी ११ वाजता मानव्यशास्त्र सभागृहात क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. वाळवा येथील क्रांतिसिंह नाना पाटील महाविद्यालयाचे मराठी विभागप्रमुख प्रा. मल्लिकार्जुन माळगी हे '१९४२ ची चळवळ आणि क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड यांचे कार्य' या विषयावर बोलणार आहेत. अध्यक्षस्थानी मानव्यशास्त्र विद्याशाखेच्या अधिष्ठाता प्रा. डॉ. भारती पाटील असणार आहेत. कार्यक्रमास उपस्थितीत राहण्याचे आवाहन कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, इतिहास विभागप्रमुख डॉ. नंदा पारेकर यांनी केले आहे.

◆ व्याख्यानमाला : शिवाजी विद्यापीठातील इतिहास अधिविभागाच्यावतीने क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड व्याख्यानमाला. वक्ते : प्रा. मल्लिकार्जुन ऊर्फ राजा माळगी. विषय : १९४२ ची चळवळ आणि क्रांतिअग्रणी जी. जी. बापू लाड यांचे कार्य. स्थळ : शिवाजी विद्यापीठ मानव्यशास्त्र सभागृह. वेळ : सकाळी ११ वा.

# बायोगॅसद्वारे विद्यापीठ स्वयंपूर्ण

**Anuradha.kadam**
@timesgroup.com
Tweet : anuradhakadamMT

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात बायोगॅस प्रकल्पाच्या माध्यमातून दरवर्षी स्वयंपाकाच्या गॅसवर होणाऱ्या पाच लाख रुपयांच्या खर्चात बचत होणार आहे. सध्या कमवा व शिका योजना विभागातील विद्यार्थ्यांच्या वसतिगृहासाठी दररोज दोन एलपीजी सिलिंडरच्या वजनाचा गॅस तयार करणारा बायोगॅस प्रकल्प अंतिम टप्प्यात असून जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात बायोगॅसचा प्रत्यक्ष वापर सुरू होणार आहे.

## झिरो गार्बेजचे प्रयत्न; वार्षिक पाच लाखांची बचत शक्य

जलसाठ्यांद्वारे पाण्याचा प्रश्न सोडवण्यात आल्यानंतर आता बायोगॅस प्रकल्पामुळे झिरो गार्बेज ठरणाऱ्या विद्यापीठांच्या यादीत शिवाजी विद्यापीठाचा समावेश झाला आहे. कमवा व शिका विभागातील शंभर विद्यार्थ्यांचा स्वयंपाक बायोगॅसद्वारे केला जाणार आहे. विद्यापीठातील सात वसतिगृहे, पाच कँटिन, एक अतिथीगृह तसेच आवारातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची निवासस्थाने येथील ओला कचरा बायोगॅस प्रकल्पासाठी वापरण्यात येणार आहे. यापासून रोज २८ ते ३० किलो गॅस बनेल इतक्या कचऱ्याचे विघटन केले जाणार आहे. कचऱ्यापासून बायोगॅस निर्मितीसाठी विद्यापीठ आवारातील आरोग्यकेंद्र व 'कमवा आणि शिका' इमारतीच्यामध्ये असलेल्या रिकाम्या जागेत तीन टाक्या बांधल्या आहेत. २४ घनमीटर क्षमतेच्या या टाक्यांमध्ये रोज साठणाऱ्या ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करून त्यापासून गॅसनिर्मिती करण्यात येणार आहे.



शिवाजी विद्यापीठात बायोगॅस प्रकल्पाच्या उभारणीसाठी बांधण्यात आलेल्या तीन टाक्या.

**पृथ्वी रक्षण**

> बायोगॅस प्रकल्पाच्या उभारणीसाठी ८ लाख रुपयांचा खर्च आला आहे. संजय रानमाळे यांच्या देखरेखीखाली काम सुरू असून येत्या दहा दिवसांत बायोगॅस प्रकल्प पूर्ण होणार आहे. विद्यापीठातील ओला कचरा उपयोगात आणून त्यापासून विद्यापीठाच्या खर्चात होणारी बचत आणि पर्यावरणाचे रक्षण हा प्रकल्पाचा मुख्य हेतू आहे. दर महिन्याला ४० हजार रुपयांचा देखभाल खर्च असून त्यासाठी स्वतंत्र यंत्रणा कार्यान्वित करण्यात येणार आहे.
>
> – जी. एस. कुलकर्णी, स्वच्छता निरीक्षक, बायोगॅस प्रकल्प

**८ लाख**
बायोगॅस प्रकल्पाचा खर्च

**४० हजार**
प्रकल्पाचा दरमहा देखभाल खर्च

**९०० किलो**
प्रकल्पाद्वारे दरमहा तयार होणारा गॅस

**५ लाख**
गॅसखरेदी खर्चातील वार्षिक बचत

**८० किलो**
सुक्या कचऱ्यापासून रोजची खतनिर्मिती

टाक्यांच्या बांधणीसाठी सिमेंटचा वापर केल्याने त्या लीक होणार नाहीत याची काळजी घेतली आहे. बायोगॅस प्रकल्पाशेजारीच उभारण्यात आलेल्या शेडमध्ये सुका कचरा साठवून त्यापासून खतनिर्मिती करण्यात येणार असून त्याचेही काम सुरू झाले आहे. खतापासून विद्यापीठातील सर्व फुलझाडे, विभागांसमोरील बागेतील झाडांच्या संगोपनाचा प्रश्न सुटणार आहे. दररोज ८० किलो खत निर्मितीही या बायोगॅसप्रकल्पातून होणार आहे.


सर्व कचरा दररोज संकलित करून बायोगॅस प्रकल्पास्थळी देण्याचा ठेका निविदाप्रक्रियेद्वारे देण्यात येणार आहे. येत्या आठवड्यात निविदा प्रसिद्ध होईल.

# कुस्ती प्रशिक्षक बी. टी. भोसले यांचे निधन

**कोल्हापूर : क्रीडा प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाचे कुस्ती प्रशिक्षक व निवृत्त क्रीडा विभागप्रमुख बापूसाहेब तुकाराम तथा बी. टी. भोसले (वय ८४) यांचे निधन झाले. मूळचे सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील शिरगावचे असणारे बी. टी. भोसले कोल्हापुरातील माळी कॉलनीत वास्तव्यास होते. त्यांच्या मागे दोन मुलगे, मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

२९ मे १९३६ ला शेतकरी कुटुंबात बापूसाहेबांचा जन्म झाला. घरची स्थिती बेताचीच होती. वाळवा येथील हुतात्मा किसन अहिर विद्यालयात त्यांनी प्राथमिक व माध्यमिक शिक्षण पूर्ण केले. त्यासाठी ते दररोज शिरगाव ते वाळवा चालत जायचे. ११ वी पास झाल्यानंतर त्यांनी पुढील शिक्षणासाठी



कोल्हापूर गाठले. प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंगमध्ये राहून त्यांनी पुढील शिक्षणासाठी राजाराम कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. वसतिगृहात बदामाची थंडाई, खारीक-खोबरे यांच्याऐवजी जोंधळ्याची भाकरी व तुरीच्या आमटीचा कसदार आहार खाऊन शिक्षणाबरोबरच कुस्ती खेळात त्यांनी नावलौकिक कमविला. या कसदार आहाराच्या जोरावरच त्यांनी कोलंबो (श्रीलंका) येथील अ. भा. कुस्ती संघात स्थान मिळवून यशस्वी कामगिरी केली.

राजाराम कॉलेजमधील चार वर्षांच्या शिक्षणानंतर १९६१ ला त्यांनी कांदिवली (मुंबई) येथे शारीरिक शिक्षण कोर्स केला. १९६२ ला पतियाळा (पंजाब) येथे एनआयएस कोर्स केला. १९६५ ला मँचेस्टर (इंग्लंड) येथे झालेल्या कुस्ती सामन्यावेळी ते आंतरराष्ट्रीय कुस्ती पंच परीक्षा उत्तीर्ण झाले. राजाराम कॉलेजमध्ये क्रीडा संचालक म्हणून सक्रिय असताना बापूसाहेबांना रशियन सरकारची शारीरिक शिक्षणाची शिष्यवृत्ती मिळाली. ही शिष्यवृत्ती मिळविणारे ते भारतातील पहिलेच मानकरी ठरले. १९६३ ला त्यांनी ताश्कंद (रशिया) येथे रशियन भाषेचा कोर्स केला. १९६६ ला त्यांनी मास्को (रशिया) येथे डी.पी.एड. कोर्स पूर्ण केला. यासाठी त्यांनी 'कुस्ती' हा विषय निवडला. त्यानंतर भारत सरकारने त्यांची दिल्ली येथे प्रशिक्षक म्हणून नियुक्ती केली; पण त्यांनी ही संधी नाकारली. त्यांनी आपली कर्मभूमी 'शाहूनगरी' कोल्हापुरातील शिवाजी विद्यापीठात नोकरी मिळविली. ३० वर्षांच्या सेवा काळात त्यांनी विद्यापीठ संघास ९ वेळा पहिला, ६ वेळा दुसरा, ४ वेळा तिसरा क्रमांक मिळवून दिला. इतकेच नव्हे, तर विद्यापीठाला ३४ सुवर्ण, २७ रौप्य व २२ कास्य पदके मिळवून दिली. राम सारंग, संभाजी पाटील, संभाजी वरुटे असे अनेक मल्ल त्यांनी घडविले. कुस्तीबरोबरच इतर खेळांचाही त्यांनी विकास केला.